**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मॉरिशसच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा/ उभय देशांमधे ४ महत्त्वाचे करार

- नेपाळमधे अराजकाच्या पार्श्वभूमीवर सीमावर्ती भागात सुरक्षेत वाढ

- कुख्यात गुन्हेगार मुनवर खानला कुवेतहून भारतात परत आणण्यात सीबीआयला  यश

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताची विजयी सलामी

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. बाबतपूर विमानतळावर उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. मॉरीशसचे प्रधानमंत्री नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी त्यांची द्विपक्षीय चर्चा झाली. अंतराळ, आणि विज्ञान क्षेत्रातल्या विविध प्रकल्पांमधे सहकार्याचे करार यावेळी झाले. तसंच आरोग्य, ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा, सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि सागरी अर्थव्यवस्था या क्षेत्रातल्या सहकार्याविषयी  चर्चा झाली.

यावेळी भारत आणि मॉरीशस यांच्यात चार सामंजस्य करार झाले.  विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्यासाठी सामंजस्य करार, वैज्ञानिक औद्योगिक संशोधन परिषद, राष्ट्रीय समुद्रशास्त्र संस्था आणि मॉरीशस समुद्रशास्त्र संस्था यांच्यातील करार, भारतातील कर्मयोगी भारत, डीओपीटी आणि मॉरीशसमधील सार्वजनिक सेवा आणि प्रशासकीय सुधारणा मंत्रालय यातील करार तसंच उपग्रह प्रक्षेपणासाठी दूरसंचार केंद्र स्थापन करणं, अवकाश संशोधन यासंबंधी दोन्ही देशात सामंजस्य करार करण्यात आले.  तसंच ऊर्जा क्षेत्र आणि लघु उद्योग प्रकल्पांच्या दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी भारताकडून अनुदान सहाय्यासाठी करार करण्यात आला. त्याचप्रमाणे जलविज्ञान क्षेत्रातील कराराचं नूतनीकरण करण्यात आलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या पूरग्रस्त भागाची हवाई पाहणी करणार आहेत, त्यानंतर यासंदर्भात डेहराडून इथं बचाव आणि पुनर्वसन कार्याचा आढावा घेणारी उच्चस्तरीय बैठक ते घेतील.

**<><><>**

बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधे भारत-नेपाळ सीमेवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. व्यापारी चौक्या आणि इतर प्रवेश जागांवरही विशेष दक्षता घेण्यात येत आहे. दरम्यान पोलीस आणि सशस्त्र सीमा दलही सीमापार हालचालींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहेत. नेपाळच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून, नेपाळ ते भारताच्या जयनगर दरम्यानची रेल्वे सेवा पुढील सूचना येईपर्यंत स्थगित करण्यात आली आहे.

**<><><>**

नेपाळमधे अराजकाच्या पार्श्वभूमीवर हंगामी सरकारच्या स्थापनेसाठी राष्ट्रपती रामचंद्र पौडेल, लष्करप्रमुख अशोकराज सिगडल आणि तरुणांचे प्रतिनिधी यांच्यात चर्चा सुरू आहे. हंगामी सरकारचं नेतृत्व करण्यासाठी युवा प्रतिनिधींनी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सुशीला कार्की यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती सूत्रांनी दिली. १९८९ नंतर सार्वजनिक पदांवर असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी, युवा वर्गाच्या प्रतिनिधींना समाविष्ट करण्यासाठी संसदेची निवडणूक आणि थेट निवडून आलेल्या प्रतिनिधींसाठीची यंत्रणा या विषयांवर युवा प्रतिनिधींची सैन्यदलाशी चर्चा झाली. भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी आणि अशा खासदारांना मंत्रीपदं मिळू नयेत अशी तरतूद करण्याविषयी या बैठकीत चर्चा करण्यात आली.

**दरम्यान**, माजी प्रधानमंत्री पुष्पकमल दहल प्रचंड यांनी युवा आंदोलकांना पाठिंबा दर्शवला असून हिंसाचाराची स्वतंत्र चौकशी व्हावी असं म्हटलं आहे. तसंच आंदोलकांना शांततेचं आवाहन केलं आहे. आपला पक्ष सुशासन, प्रगतीशील बदल आणि सर्वमावेशक लोकशाहीच्या बाजूचा आहे, थेट निवडून आलेलं कार्यकारी नेतृत्व, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी आणि सामाजिक न्याय हीच आपली अनेक वर्षांची भूमिका असून सध्या सुरू असलेल्या युवा वर्गाच्या चळवळीशी ही सुसंगतच आहे, असं

प्रचंड म्हणाले. चळवळ संवैधानिक आणि लोकशाही चौकटीतच व्हायला हवी, ही चौकट ओलांडली तर प्रतिगामी शक्तींना फायदा होऊ शकतो, असं प्रचंड यांनी नमूद केलं.

<><><><>

नेपाळमधे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्य सरकार युद्ध पातळीवर प्रयत्न करत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिली. ठाणे, पुणे, मुंबई, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातल्या सुमारे १०० पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आतापर्यंत प्राप्त झाली आहे.

<><><><>

नेपाळमधील अलीकडील घडामोडींमुळे तिथं अडकलेल्या प्रवाशांना मदत करण्यासाठी एअर इंडिया आणि इंडिगोनं दिल्ली ते काठमांडू आणि परत येण्यासाठी विशेष उड्डाणांची घोषणा केली आहे.

दरम्यान, नागरी उड्डाण मंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांनी विमान कंपन्यांना प्रवासी तिकीटाची किंमत वाजवी ठेवण्याचा सल्ला दिला आहे.

<><><><>

मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथून सुरू होणाऱ्या भारतीय सैन्याच्या IASV त्रिवेणी या बोटीच्या पहिल्या परिक्रमेला आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. यावेळी संरक्षण दलप्रमुख जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह हे देखील दूरस्थ पद्धतीने सहभागी झाले होते. या मोहिमेत भारतीय भूदल, नौदल आणि हवाई दलातल्या १० महिला अधिकाऱ्यांचा समावेश आहे. लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर या पथकाचं नेतृत्व करत आहेत. या प्रवासाविषयी त्यांनी अधिक माहिती दिली..

**होल्ड.. बाईट - अनुजा वरुडकर**

आयएएसव्ही त्रिवेणी ही बोट आजपासून समुद्र प्रदक्षिणेसाठी रवाना झाली असून या प्रवासाला नऊ महिने लागतील. या दरम्यान ही बोट २६ हजारांपेक्षा जास्त नॉटिकल मैलांचा प्रवास करणार आहे. प्रवासात ही बोट चार परदेशी बंदरांवर थांबणार आहे. या बंदरांवर या महिला अधिकारी भारतीय समुदायाशी संवाद साधतील. सागरी प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर ही बोट पुढच्या वर्षी मे महिन्यात पुन्हा भारतात परतणार आहे.

**<><><><>**

फसवणूक आणि बनावट कागदपत्र प्रकरणात हवा असलेल्या कुख्यात गुन्हेगार मुनवर खान याला कुवेतहून भारतात परत आणण्यात गुन्हे अन्वेषण विभागाला यश आलं आहे. यात इंटरपोल, एनसीबी कुवेत आणि एमईएचं सहकार्य मिळाल्याचं गुन्हे अन्वेषण विभागानं म्हटलं आहे. कुवेत पोलिसांनी मुनवर खानला आज हैदराबाद विमानतळावर आणलं. २०११ ला बँक ऑफ बडोदाची फसवणूक करून तो फरार झाला होता.

**<><><><>**

रत्न आणि दागिने निर्यात प्रोत्साहन परिषदेनं आयोजित केलेल्या सौदी अरेबिया आभूषण प्रदर्शन 2025 चा आज जेद्दाहमध्ये प्रारंभ झाला. जेद्दाह इथला भारतीय वाणिज्य दूतावास, रियाधमधला भारतीय दूतावास तसंच भारताच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या सहकार्यातून या दोन दिवसीय प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. या प्रदर्शनात २५० स्टॉलमधून २०० हून अधिक प्रदर्शक सहभागी होतील तर २ हजारांहून अधिक व्यावसायिक आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदार सहभागी होतील असा अंदाज आहे. या प्रदर्शनात सोनं आणि विविध रत्नाची आभूषणं, तसंच दागिने तयार करण्यासाठी वापरलं जाणारं अत्याधुनिक तंत्रज्ञान मांडण्यात आलं आहे. भारत आणि सौदी दरम्यानचे व्यापारी संबंध दृढ करणे, हा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

**<><><><>**

नव्या पिढीच्या जीएसटी सुधारणांच्या अंतर्गत, केंद्र सरकारनं अनेक वस्तूंवरच्या करात बदल केला आहे. व्यापारी वर्गाकडूनही या बदलांचं स्वागत होतआहे.

ऐकूया एका औषध विक्रेता व्यावसायिकाची प्रातिनिधिक प्रतिक्रीया..

**- होल्ड - बाईट- मेस्त्री - -**

**<><><><>**

दुबई इथं सुरू असलेल्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत, अ गटात भारतानं काल संयुक्त अरब अमिरातीच्या संघावर ९ गडी राखून विजय मिळवला. युएईच्या संघानं ५८ धावाचं लक्ष्य भारतापुढे ठेवलं होतं, ते केवळ ४ षटकं आणि तीन चेंडूत पूर्ण करताना केवळ एक गडी गमावला. अभिषेक वर्मानं १६ चेंडूत ३० धावा केल्या तर त्याला शुभमन गिलनं

२० धावा करत साथ दिली. तत्पुर्वी भारतानं युएईला १३ षटकं १ चेंडूत ५७ धावांवर बाद केले.

आजचा सामना बांगलादेश आणि हाँगकाँग या संघांमध्ये अबुधाबी इथं होणार आहे.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतला भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. येत्या १४ सप्टेंबर रोजी हा सामना होणार आहे. पहलगाम इथला दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान विरुद्ध खेळल्याने राष्ट्रीय प्रतिष्ठेला धक्का बसेल, त्यामुळे हा सामना रद्द करावा अशी याचिका कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांनी केली होती. त्यावर तातडीने सुनावणी घ्यायला आज न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि विजय बिश्नोई यांच्या पीठाने नकार दिला.

**<><><><>**

अमेरिकेतले कंझर्वेटिव्ह विचारांचे राजकीय कार्यकर्ते तसंच टर्निंग पॉईंट यू एस ए या संस्थेचे सहसंस्थापक चार्ली किर्क यांचा अमेरिकेतल्या उटाह व्हॅली विद्यापीठात झालेल्या गोळीबारात मृत्यू झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावर त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे.

**//<><><><>//**